नियमीत फौ. ख.क्र. १९२/२०२३
सरकार विरुध्द बाळकिसन
निशाणी क्र.१८

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०१) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांवः– ज्योती बबन अकोलकर
वय सुमारेः– ४६ वर्ष, व्यवसायः–नोकरी
निवासस्थानः– करंजी ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्री. ए. बी. विधाटे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

दि.२६.११.२०२२ रोजी मी तहसिल कार्यालय पाथर्डी येथे पुरवठा निरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी तहसिलदार यांना माहिती मिळाली की, मार्केटयार्ड पाथर्डी येथे रेशनिंगच्या तांदळाची गाडी उभी आहे. त्यानंतर निवासी नायब तहसिलदार मुरलीधर बागुल, पाथर्डीचे तलाठी हरिभाउ सानप यांना तहसिलदार यांनी मार्केटयार्ड येथे जावून गाडीची खात्री करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांना मार्केटयार्ड येथे पिकअप गाडी क्र. एमएच २३ डब्ल्यू ३१३९ ही गाडी मिळून आली. त्या दोघांनी ती गाडी पाथर्डी पोलिस स्टेशन येथे जमा केली. दि.२७.११.२०२२ रोजी मला तहसिलदार यांनी तोंडी आदेशित केले की, जमा केलेल्या गाडीमध्ये तांदुळ रेशनिंगचा आहे किंवा कसे तसेच बारदाणा रेशनिंगचा आहे किंवा कसे. त्यानंतर मी गाडीचा पंचनामा पंच शहाणे, शिंदे, रोडी व शिंदे यांचे समक्ष केला. आता मला दाखविणेत आलेला पंचनामा तोच असून त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **पंचनाम्यास निशाणी १९ देण्यात** येते. मी केलेल्या पंचनाम्यामध्ये ६० पांढ–या व पिवळ्या रंगाच्या गोण्यांमध्ये तांदुळ अंदाजे ३५ क्वींटल मिळून आला. ज्या गाडीचा मी पंचनामा केला त्या गाडीचे फोटो दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला **दोषारोपपत्रातील पान क्र. १७ वरील फोटो** दाखविला. तो तोच आहे. त्याला **आर्टीकल अ** देण्यात येते. त्यानंतर दि. २८.११.२०२२ रोजी वरिष्ठांच्या आदेशानुसार मी पोलिस स्टेशनला फिर्याद नोंदविली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्यादी तीच आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. **फिर्यादीस निशाणी २० देण्यात** येते.

सरतपास पुर्ण.

## उलट तपासणी आरोपीकरिता श्री. एस. के. आंधळे वकील यांचेमार्फत

२. दि. २६.११.२०२२ रोजी बुधवार होता अगर कसे हे मी निश्चित सांगू शकत नाही.

निवासी नायब तहसिलदार मुरलीधर बागुल, पाथर्डीचे तलाठी हरिभाउ सानप यांना तहसिलदार यांनी मार्केटयार्ड येथे जावून गाडीची खात्री करण्याबाबत लेखी आदेश दिला होता अगर कसे हे मी सांगू शकत नाही. तलाठी माझ्या अधिपत्याखाली काम करत नाहीत. रेशनिंग तांदुळ असल्यास तांदुळ हा शासनाच्या बारदाण्यामध्ये असतो व त्याला शासनाचे सिल असते. पंचनामा निशाणी १९ साठी खाजगी पंच वापरले. सर्व पंच हे पोलिस स्टेशनच्या आवारातील होते. पंचांचे पत्ते व मोबाईल क्रमांक घेणे मला आवश्यक वाटले नाही. तांदुळ रेशनिंगचा आहे किंवा खाजगी आहे याकरीता आम्ही त्याचे नमुने घेतले होते. परंतु त्याचा पंचनामा केला नव्हता.

प्रश्न– जप्त केलेलातांदुळ हा रेशनिंगचा होता हे तुम्हाला निष्पण्ण झाले का ?

उत्तर– बराच वेळ देवूनही साक्षीदाराने प्रश्नास उत्तर दिले नाही.

३. तांदुळ हा किरकोळ व होलसेल विक्रेत्याकडे उपलब्ध असतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने तांदुळ खरेदी केल्याच्या पावत्या मला दिल्या होत्या. **आरोपींतर्फे प्रस्तुत साक्षीदार याने आरोपीचा घेतलेला जबाब मान्य केल्याने आरोपीच्या जबाबास निशाणी २१ देण्यात** येते. तहसिलदार यांनी फिर्याद दाखल करण्याबाबत लेखी आदेश मला दिले नव्हते.

प्रश्न– आरोपीकडुन जप्तकेलेला तांदुळ हा रेशनिंगचा नव्हता ?

उत्तर– संशय होता

४. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेला तांदुळ हा रेशनिंगच्या बारदाण्यामध्ये नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी कागदपत्रे लिहिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटा पंचनामा केला व खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासतील मजकूर खोटा नमुद करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः १७.११.२०२५.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.11.18 10:43:02 +0530

(**रविकिरण सपाटे** )

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पाथर्डी जि. अहमदनगर.